
# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

वर्ष : ४ । अंक : २ । सप्टेंबर २०२१ (मासिक) । मूल्य ₹ १०० । AED 10 | US$ 2 www.panthastha.com



पर्सनल सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (PSR)

चांगुलपणाचा निर्देशांक

तिचं धाडस...! आणि तिचा माझ्यावर प्रभाव..!!

बेभरवशाची रुग्णसेवा

# तुमचा व्यवसाय, उद्योग, सेवा जगभरच्या निवडक लोकांपर्यंत कसा काय पोहचेल? विश्व पांथस्थच्या साहाय्याने

**विश्व पांथस्थ मासिकात जाहिरात का करावी**

अनिवासी भारतीय जवळपास ४८ पेक्षा जास्त देशांत स्थलांतरित झाले आहे. जवळपास २ करोड पेक्षा जास्त भारतीय या देशांत वास्तव्य करत आहेत. त्यापैकी मराठी अनिवासी साधारण २० लाख असतील. हे मराठी व अनिवासी भारतीय भारतातील अनेक वस्तूंची व सेवांची खरेदी करतात. त्याचे मूल्य दरवर्षी साधारण एक हजार करोड रुपयांपेक्षा जास्त असते. एनआरआय ची मुख्य गुंतवणूक अथवा खर्च रिअल इस्टेट, ट्रॅव्हल टुरिसम, हॉस्पिटॅलिटी, हेल्थकेअर, रेस्टॉरंट व हॉटेल, फूड, कपडेलत्ते, एजुकेशन, रिटेल सेक्टर, एफएमसीजी, सामाजिक व धार्मिक संस्थांना दान, या प्रमुख सेक्टर मध्ये होते. त्यामुळे या सेक्टर मध्ये कार्यरत सगळ्या कंपन्यांनी, व्यक्तींनी, संस्थांनी मराठी अथवा भारतीय एनआरआय पर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**मासिकाबद्दल थोडक्यात**

विश्व पांथस्थ हे अनिवासी भारतीयांसाठी २०१५ मध्ये सुरु केलेले ठछख रजिस्टर्ड एकमेव मासिक आहे. आजपर्यंत या मासिकाचे छापील अंक युएई, बहरैन, सौदी अरेबिया, कुवैत, ओमान, भूतान, आफ्रिका, युरोप, रशिया, सिंगापूर, बँकॉक, मलेशिया, फार ईस्ट, अमेरिका या अनेक ठिकाणी पोहचले आहे. छापील अंक पाठवण्याचा खर्च जास्त येतो म्हणून डिजिटल स्वरूपात या मासिकाचा डिजिटल अंक सोशल मीडिया मधून अनेक सामाजिक मंडळे, बिझनेस फोरम, अनेक सामाजिक संस्था, हजारो व्यक्तींपर्यन्त पोहचतो. मासिकाची वेबसाईट आहे, एक मोबाईल ॲप आहे, त्याठिकाणी देखील जाहिरात प्रसिद्ध केली जाते. भारतात अनेक राज्यात हे छापील अंक तसेच डिजिटल अंक वितरित केले जातात. यातील असंख्य अंक फ्री दिले जातात. अनेक वाचनालये, अनेक कॉन्फरन्स या ठिकाणी हे अंक वितरित करण्याचा प्रयत्न केला जातो. महाराष्ट्र राज्य सरकारने तसेच माजी मुख्यमंत्री यांनी मासिकासाठी विशेष शुभेच्छा दिल्या आहेत व या उपक्रमाचा गौरव केला आहे.

विश्व पांथस्थ हे केवळ मासिक नाही, हा एक उपक्रम आहे. मासिक हे माध्यम आहे. आपले सहकार्य व सहभाग या उपक्रमाला एक नवीन ऊर्जा देईल. या माध्यमातूम तुमचा व्यवसाय उद्योग भरभराटीला आला तर आम्हाला त्याचा खूप आनंद होईल.

**मासिकासाठी जाहिरातीचे दर (एका जाहिरातीसाठी दर रुपयात, सर्व जाहिराती रंगीत)**

| | |
|---|---|
| कव्हर पेज दोन- रुपये २०,००० | कव्हर पेज तीन - रुपये २०,००० |
| बँक पेज . रुपये २५,००० | पूर्ण पान . रुपये १५,००० |
| अर्धे पान . रुपये १०,००० | |

जाहिरात ३० दिवस अगोदर बुक केली व पूर्ण पेमेंट केले तर जाहिरात दरावर २०% वीस टक्के ते ३०% तीस टक्के पर्यंत सूट देण्यात येईल. जाहिरात सॉफ्ट कॉपी हाय रेसोलुशन मध्ये पीडीएफ व सीडीआर फाईल मध्ये द्यावी लागेल.

जाहिरात तयार नसेल तर जाहिरात तयार करण्यासाठी म्हणजे डिसाईन करण्यासाठी देखील मदत करण्यात येईल, डिसाईन चार्जेस वेगळे आकारले जातील. जाहिरातीचे संपूर्ण शुल्क जाहिरात प्रसिद्ध होण्यापूर्वी द्यावे लागेल.

**जाहिरातीसाठी व अधिक माहिती साठी संपर्क**

**ई-मेल-** editor@panthastha.com | मोबाईल व्हाट्सएप - +९१ ९८६०६७८८४४ | www.panthastha.com

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. संपादकीय – पर्सनल सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (PSR) | ४ |
| २. चांगुलपणाचा निर्देशांक –प्रविण मानकर | ७ |
| ३. तिचं धाडस...! आणि तिचा माझ्यावर प्रभाव..!!–अतुल कुलकर्णी | ८ |
| ४. बेभरवशाची रुग्णसेवा –ॲड.समीर शिंदे | ११ |
| ५.नो स्कुल नो फीस आंदोलन: विचार और सुझाव | १३ |
| ६.विश्व पांथस्थ प्रवासाच्या टिप्स – राजस्थान | १५ |


विश्व पांथस्थ
अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA


विश्व पांथस्थ
वर्ष ४ अंक २
सप्टेंबर २०२१

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

संपादक
संदीप वसंतराव कडवे

संपादकीय व वितरण साहाय्य

राजन तावडे, अबू धाबी
गजानन खोलगडे, बहरीन
धवल नांदेडकर, फुजेरा
वीरभद्र कारेगावकर, अजमान
नितीन गायकवाड, औरंगाबाद
ॲड. समीर शिंदे, नाशिक

मुखपृष्ठ आणि सजावट
सौ.मानसी कुलकर्णी,(मानसी आर्टस्)पुणे

मूल्य ₹ 100 | AED 10| US$2

Vishwa Panthastha
Year 4 Issue 2
September 2021

First Marathi Monthly For NRI Maharashtrian

Editor
Sandeep Vasantrao Kadwe

Editorial & Distribution Support
Rajan Tawde, Abu Dhabi
Gajanan Kholgade, Bahrain
Dhawal Nandedkar, Fujerah
Veerbhadra Karegaonkar, Ajman
Nitin Gaikwad - Aurangbad
Adv.Sameer Shinde- Nashik

Cover & Design
Manasi Kulkarni (Manasi Arts) Pune

Price : ₹ 100 AED 10 US$ 2

विश्व पांथस्थ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी ए-७०३, निसर्ग सिटी-२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे - ४११०५७ येथे प्रसिद्ध केले.
संपादक – संदीप वसंतराव कडवे
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

'Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe, and published at A-703, Nisarg City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune -411057.
Mob.: +91 9860678844
e-mail: editor@panthastha.com
website: www.panthastha.com
Editor - Sandeep Vasantrao Kadwe
(Responsible for Selection of News & Articles under the PRB Act.)



या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

विश्व पांथस्थ

संपादकीय



# पर्सनल सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (PSR)

गेल्या तीन दशकात मी अनेक कॉर्पोरेट प्रकल्पात सहभागी झालो. अनेक सामाजिक कार्यात देखील सहभागी झाल्यानंतर CSR चे नवीन स्वरूप म्हणजे PSR आपल्यासमोर मांडावे असा विचार मनात आला. PSR हा विचार यापूर्वी या प्रकारे PSR या नावाने कुणी मांडला नाही. प्रथमच हा विचार अशा स्वरूपात मी मांडत आहे. PSR चे अनेक पदर आहेत, त्यावरही नंतरच्या लेखात विस्तृत प्रकाश टाकीन.

PSR वर हा लेख लिहिण्यास सुरवात केली तेव्हा कोरोनाने अजून विक्राळ रूप धारण केले नव्हते. वैयक्तिक सामाजिक जबाबदारीची एव्हढी आवश्यकता यापूर्वी बहुधा कधीच जाणवली नव्हती. कोरोनाने खूपच संदर्भ बदलले आहेत. परंतु PSR ची गरज किती जास्त आहे याची प्रचिती करून दिली आहे.

तुम्हाला कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी CSR माहित असेल तर PSR म्हणजे काय हे समजायला सोपे जाईल.

CSR म्हणजे काय हे थोडक्यात सांगतो. कंपनीचे उद्दिष्ट हे नफा कमावणे हेच असते. कंपनी देत असलेल्या प्रॉडक्ट्स व सर्विसेसच्या विक्रीतून हा नफा होत असतो. हे प्रॉडक्ट्स व सर्विसेस बनवण्यासाठी कंपनीचे कर्मचारी काम करतात. त्यांना पगार मिळतो. कंपनी बनवण्यासाठी शेअर होल्डर गुंतवणूक करतात. त्यांना नफ्यातील हिस्सा मिळतो. विक्रीसाठी कर्मचारी, जाहिरातदार, डीलर्स, सेल्समन, असा मोठा पसारा असतो. त्यांना पगार व विक्रीवर कमिशन मिळते. कच्च्या मालाचा पुरवठा करणाऱ्यांना त्याची किंमत मिळते. कंपनीला सर्विसेस पुरवणाऱ्या अनेकांना त्याचा मोबदला मिळतो. सरकारला टॅक्स मिळतो.

हे सर्व मालाच्या विक्रीतून कमावलेल्या पैश्यातून होते. ग्राहकाला प्रॉडक्ट व सर्व्हिसेस मिळतात, त्याने दिलेल्या पैश्याचा मोबदला पुर्णतः अथवा अंशतः वस्तू अथवा सेवेच्या उपभोगातून मिळतो. असे सगळ्यांना सगळे मिळते. मग कोणाला काय द्यायचे राहते ? व ते का द्यावे ?

तर कंपनी उभी करतांना अनेक जण मदत करतात. त्यांनी केलेल्या मदतीचे मूल्य संपूर्णपणे पैश्यात करता येत नाही. अनेकांना ते मूल्य पूर्णपणे मिळत देखील नाही. अनेकदा अनेक जण अतिशय अमूल्य मदत करून जातात, त्यांना काहीही मोबदला मिळत नाही, साधे श्रेय देखील मिळत नाही. अनेक अज्ञात व्यक्ती व संस्था बिझनेस उभा करण्यास मदत करतात व त्या बदल्यात काही अपेक्षाही करत नाहीत.

तर दुसरीकडे कंपनी अथवा बिझनेस चालवतांना अनेक जण बाधित होतात, त्यांचे नुकसान होते. आर्थिक, कौटुंबिक,

खाजगी, मानसिक, शारीरिक अश्या अनेक प्रकारे त्यांचे नुकसान होते व त्याचा कुठेही हिशोब ठेवला जात नाही, त्याची दखल घेतली जात नाही.

अनेक कंपन्यांचे प्रॉडक्ट्स व सर्विसेस हे ग्राहकाला घटक नुकसान पोहचवणारे असतात. दारू विक्रेते, सिगारेट विक्रेते अशी अनेक जण या वर्गात येतात. काही कंपन्या पर्यावरणाचा ऱ्हास करतात. त्यातून फायदा कमावतात. पर्यावरणाच्या नुकसानीचा फटका अनेकांना बसतो, त्याची भरपाई करणे अशक्य असते.

या सर्व कंपन्यांना समाजसेवेची एक संधी मिळावी, झालेलं नुकसान भरून देण्याची संधी मिळावी, ज्यांनी परोक्ष अथवा अपरोक्ष अज्ञात राहून मदत केली, त्यांच्याबद्दल कृतज्ञता म्हणून कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) च्या नावाखाली कंपन्या अनेक प्रोजेक्ट्स करतात. तसेच कंपन्यांना मदत करणारी व्यवस्था देखील शाबूत राहावी, मजबूत व्हावी म्हणूनही काहीजण CSR प्रोजेक्ट्स करतात. यात स्वयंप्रेरणेने CSR करणारे कमी असतात. सरकारने जबरदस्ती केल्याने CSR प्रोजेक्ट्स करणारे किंवा केल्यासारखे दाखवणारे अनेक असतात.

जसे कंपन्यांच्या जडण घडणीत अनेकांचा अनेक प्रकारे मोलाचा सहभाग असतो तसा प्रत्येक व्यक्तीच्या जडणघडणीत देखील अनेकांचा फार मोलाचा सहभाग असतो. एखादी व्यक्ती यशस्वी होते तेव्हा त्यामागे अनेक जण प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या आपले योगदान देतात. अर्थात एखादी व्यक्ती यशस्वी होतांना तिने अनेकांना दुखावले असण्याची शक्यता असतेच. त्या व्यक्तीमुळे अनेकांना त्रास झालेला असतोच. अश्या त्रास झालेल्या व्यक्ती बऱ्याचदा अज्ञात राहतात किंवा असतात. आपल्या वागण्यामुळे कुणाला त्रास झाला असेल याची अनेकदा लोकांना कल्पनाच नसते. आपल्या यशस्वी होण्यामागे कित्येक अज्ञात व्यक्ती असतात याचीही कित्येक लोकांना कल्पना नसते, जाणीव देखील नसते. ही जाणीव जागृत व्हावी, त्यानुसार प्रत्येकाने आपण ज्याला दुखावले त्याची अंशतः तरी भरपाई करावी किंवा ज्याने आपल्याला मदत केली त्याची थोड्या प्रमाणात तरी उतराई होण्याची कृती करावी, म्हणून आज पर्सनल सोशल रिस्पॉन्सिबिलिटी PSR या संकल्पनेची विश्व पांथस्थाच्या माध्यमातून मांडणी करत आहोत. तुम्हाला ही संकल्पना पटेल व त्यानुसार तुम्ही विश्व पांथस्थ तर्फे हाती घेतलेल्या अनेक PSR प्रोजेक्ट्स मध्ये सहभागी व्हाल अशी अपेक्षा आहे.

अर्थात आपण सर्व जण या ना त्या प्रकारे PSR करताच असतो. आपल्याला त्याची जाणीव नसते. परंतु दान देखील सत्पात्री असावे. अनाठायी, अयोग्य, अकारण व अवेळी केलेले दान अथवा कर्म याचे फळ देखील अयोग्यच असते. उदाहरण द्यायचे झाले तर इन्स्टंट पुण्य कमावण्याचा मार्ग म्हणून अनेक जण रस्त्यावरील भिकाऱ्याला भीक देतात व फार मोठे पुण्य केल्याचे समाधान मिळवतात. परंतु त्यामुळे कदाचित एका भिकारी माफिया व्यवस्थेला आपण खतपाणी घालत आहोत, ज्यामुळे शेवटी आपल्याच त्रास होणार आहे याची अनेकांना कल्पना नसते. हेच भिकारी माफिया नंतर गावागावातून लहान मुले, स्त्रिया पळवतात व त्यांना भिकेच्या धंद्यात लावतात. यात कदाचित त्या दान देण्याऱ्या व्यक्तीच्या निकटवर्तीयाचा समावेश असू शकतो. हेच माफिया अधिक मोठे होऊन नंतर ड्रग्स, शस्त्र विक्री, देह विक्री, अनेकांचे शोषण, खंडणी, अपहार, अनाचार, लुटतात, देशविरोधी कारवाया, करतात व जाहीर आहे याचा आपल्या सर्वांना प्रचंड त्रास होतो. यात अनेक जीव देखील जातात. समाज बरबाद होतो. म्हणजे आपण केलेली एक साधी भीक देण्याची कृती देखील आपल्याला भिकेला लावू शकते.

आपल्यातील अनेक जण देवदेव करतात, अनेक देवळांना अथवा धार्मिक स्थळांना भेटी देतात. त्याठिकाणी दानधर्म करतात. खूप ठिकाणी या दानाचा सुयोग्य वापर केला जातो. परंतु अनेक ठिकाणी या दानाचा उपयोग फक्त काही निवडक मंडळींना होतो व समाजासाठी त्याचा काहीच उपयोग होत नाही. हीच मंडळी मग अशा श्रद्धास्थानावर कब्जा करतात, मनमानी करतात, श्रद्धेने आलेल्या भाविकांना लुबाडतात व पर्यायाने

समाजाचे, आपले व राष्ट्राचे नुकसान करतात. याची जाणीव आपल्याला नसते, कारण आपण दान देऊन पुण्य कमावल्याच्या भावनेत सुखी असतो. दानाचे परिणाम आपल्याला माहित नसतात. कोरोनासारख्या आपत्तीमध्ये कुठल्याही धर्माच्या कुठल्याही मोठ्या देवस्थानाने काही विशेष मदत केल्याचे समोर आले नाही, परंतु धार्मिक स्थळे उघडण्यासाठी मात्र वारंवार राजकीय व सामाजिक दबाव निर्माण केला जात आहे. अर्थात सरकारने याबाबत काही कठोर निर्णय घेतले आहेतच.PSR मध्ये हाच मुद्दा महत्वाचा आहे. आपले दान सत्पात्री लागावे म्हणून योग्य व्यक्ती कोण, याचा शोध घेण्याची व त्यावर खोलवर विचार करण्याची आज फार मोठी गरज निर्माण झाली आहे.आपण दिलेल्या दानातून कदाचित कोणाचे भले होईल एव्हढी आपली दानाची पात्रता नसेलही, किंवा सत्पात्री दानाची मागणी अथवा गरज फार मोठी असेल, तेव्हा एकत्ररित्या आपण PSR प्रोजेक्ट्स हाती घेऊ शकतो. दान फक्त पैश्याचंच द्यावे का? तर नाही. आपण चांगल्या भावनेतून दिलेली कुठलीही वस्तू अथवा सेवा दानास पात्र असते. आपण वेळ देऊ शकतो, सेवा देऊ शकतो, ज्ञान देऊ शकतो, आपल्या संपर्कातील व्यक्तीची सुखदु:ख समजावून घेऊन त्यांना आपल्या कुवतीनुसार मोबदल्याची अपेक्षा न ठेवता मदत करू शकतो.

अनिवासी भारतीयांची समाजकार्यात सामील होण्याची खूप इच्छा असते. मायभूमीसाठी काही करण्याची तळमळ असते. पण त्याला मार्ग सापडत नाही. मग परदेशात साजरे होणे सण उत्सव यात सामील होऊन, परदेशातील धार्मिक स्थळांना दानधर्म करून अथवा जुने कपडे, वस्तू याचे दान करून इन्स्टंट पुंण्याचा सोपा मार्ग पत्करला जातो. सुट्टीत भारतात येऊन भारतातील धार्मिक स्थळांना, निवडक व माहिती असलेल्या आश्रम शाळांना, वगैरे दान करूनही हा मार्ग अवलंबला जातो. पण बहुतांशी हा सर्व ''इन्स्टंट ग्रॅटिफिकेशन'' किंवा ''इन्स्टंट सॅटिसफॅक्शन''असा काहीसा मार्ग असतो. खऱ्या गरजवंतांपर्यंत ही मदत पोहचेल अशी शक्यता कमीच असते. पण खरा गरजवंत शोधायचा कसा, असा प्रश्न पडतो. विश्व पांथस्थ ने हा सेतू निर्माण करण्याचा प्रयत्न चालू केला आहे. खरे गरजवंत शोधणे हा एक मार्केट रिसर्चच आहे. त्यासाठी योग्य कौशल्य व मानसिकता असलेले कार्यकर्ते, वेळ, श्रम, पैसे खर्च होतात. काही कार्यकर्ते पर्सनल सोशल रिस्पोन्सबिलिटी म्हणूनही हे योगदान देऊ शकतात. मध्यंतरी अतिवृष्टीमुळे व पुरामुळे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी प्रचंड जीवित वित्त हानी झाली. महाड जवळील पोलादपूर येथे एका गावात भिंत कोसळून एका धाडसी मुलीला आपला पाय गमवावा लागला, या आपत्तीची माहिती मुंबईचे पत्रकार श्री रवींद्र मालुसरे यांच्या तर्फे पांथस्थला कळल्यावर आपले एक वाचक, कुवैत मधील श्री सतीश देशपांडे यांना याबाबत कळवले. त्यांनी यापूर्वीच समाजसेवा करण्यासाठी आपली सहमती दर्शवली होती. त्यानुसार त्यांनी तातडीने आपली आर्थिक मदत पांथस्थला पाठवली व ती तातडीने गरजू मुलीला पोहोचती झाली. श्री सतीश देशपांडे यांचे मनापासून धन्यवाद! ''पांथस्थ''ला अशा कार्यकर्त्यांची व देणगीदारांची गरज आहे. परदेशातील भारतीयांची व भारतातील नागरिकांची आताची परिस्थिती बघता अशी मदत भारतात व भारताबाहेर देखील करावी लागेल अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे केवळ आर्थिकच नाही तर पांथस्थबरोबर स्वयंसेवी कार्यकर्ता म्हणून देखील समाजसेवी प्रकल्पावर काम करण्यासाठी अनेक हातांची गरज आहे. समविचारी व्यक्तींनी एकत्र येऊन विचार विनिमय देखील करण्याची गरज आहे. ''पांथस्थ'' हा मंच यासाठी प्रयत्नशील आहेच, तुम्ही नक्की या प्रयत्नात सामील व्हा असे सर्वांना कळकळीची विनंती. संपर्कासाठी editor@panthastha.com या इमेल वर संपर्क साधावा.

OOO

# चांगुलपणाचा निर्देशांक



– प्रविण मानकर

लेख वाचल्यानंतर स्वत: ला विचारा 'माझा चांगुलपणाचा निर्देशांक काय आहे?'

बॅकपॅकर अर्थात पांथस्थ असल्याने, बर्याचदा मला अशा प्रश्नांचा सामना करावा लागतो:

जर तुम्ही लांब पल्ल्याचा प्रवास करत असाल व तुमची स्कूटर /गाडी पंक्चर झाली तर?

परदेश प्रवासादरम्यान तुम्ही आजारी पडला तर?

मोठ्या शहरांमध्ये फिरताना तुम्ही भरकटलात किंवा तुमचा रस्ता चुकला आहे का?

परदेश प्रवास करताना तुमचे पाकीट किंवा पासपोर्ट हरवला आहे का?

परदेशात किंवा अनोळखी प्रदेशात तुम्हाला कधी जीवघेण्या परिस्थितीचा सामना करावा लागला आहे का?

मी सहसा या प्रकारच्या घटनांबद्दल फार विचार करत नाही आणि असे काही घडले तरीही मी आसपासच्या स्थानिक लोकांवर व सहप्रवाश्यांवर विश्वास ठेवतो आणि मदत घेतो. नव्यानवे टक्के मी कठीण परिस्थितीतून सुरक्षितपणे बाहेर पडतो किंवा मी परिस्थितीवर विजय मिळवतो. केवळ एक टक्का इतकीच जोखीम असल्याने प्रयाण करायला काहीच हरकत नाही असे माझे मत आहे. माझ्या बॅकपॅकिंगच्या दीर्घ साहसी अनुभवातून हा आशावाद निर्माण झाला आहे.

मला असे वाटते 'मी एखाद्याला मदत केली पाहिजे' ही पृथ्वीवरील कोणत्याही मानवाची मानसिक गरज आहे. सगळ्यात महत्वाचे म्हणजे कोणत्याही अपेक्षेशिवाय केलेली प्रामाणिक मदत देणाऱ्याला प्रचंड निरामय आनंद देते.

मानव स्वाभाविकपणे चांगला आहे आणि वाईट काहीही कायमचे टिकू शकत नाही. जे टिकते ते आहे 'चांगले वर्तन', 'प्रेमाने मदत' करूया. असे आपल्या संतांनी पण सांगितले आहे. हे जग सर्वांसाठी सुखमय बनवण्यासाठी आपल्याला संतांचे व महान व्यक्तींचे अनुकरण करण्याची आवश्यकता आहे. चला सुसंस्कृततेचा प्रसार करूया.

मदत करण्यासाठी सहसा भाषेचा अडथळा येऊ नये. भाषेच्या अडथळ्याची पर्वा न करता दयाळूपणाची छोटी कृत्ये दाखवण्यात मी जपानींना अग्रस्थानी ठेवतो. ते अत्यंत 'सामाजिक मानसिकता असलेले' आहेत. तुर्कीला दुसरे स्थान मिळाले पाहिजे. ते आश्चर्यकारकपणे सहृदयी व भावनाशील आहेत. सामाजिक जागरूकता हे आजूबाजूच्या लोकांच्या व्यापक जागरूकतेचे प्रकटीकरण आहे. मी भारतीयांना तिसरा क्रमांक देईन कारण मी अनुभवले आहे की लोकांनी मला त्यांची कामे बाजूला ठेवून मदत केली. तुम्ही विचारण्यापूर्वी हे सर्व लोक मदत करतात. त्यांना कळते की एखाद्याला मदतीची गरज आहे. याउलट अमेरिकन आणि ब्रिटीश अत्यंत मदत करतात जर तुम्ही मदत मागितली तरच.

बहुतेक युरोपियन लोक बॅकपॅकर्स किंवा प्रवासी लोकांपासून दूर राहणे पसंत करतात. मला कुठेतरी खोलवर वाटते, युरोपियन लोकांमधील श्रेष्ठत्वाच्या अहंगंडामुळे अंतर निर्माण होते. युरोपमध्ये त्वचेचा रंग महत्त्वाचा आहे, विशेषत: जर्मनीमध्ये. जसजसे तुम्ही युरोपच्या पश्चिमेकडे प्रवास करता तसतसे सामाजिक मानसिकता सुधारते.

जर पांथस्थांमध्ये व रस्त्यावरील किंवा स्थानिक लोकांमध्ये परस्पर संवाद असेल आणि तो विश्वासावर आधारित असेल तर प्रवासाची गुणवत्ता वाढते, आनंद वाढतो. याला 'niceness quientient' म्हणतात. तुमचे काय मत आहे? तुम्ही अनोळखी प्रवाश्यांना, पांथस्थांना मदत करता का? एक मनस्वी पांथस्थ, सध्या मुक्काम नासिक.

०००

# तिचं धाडस...! आणि तिचा माझ्यावर प्रभाव..!!





– अतुल कुलकर्णी

www.atulkularni.in वरून साभार

एकटी महिला, कोणतेही प्लॅनिंग नाही... हॉटेलचे ॲडव्हान्स बुकींग नाही... एका देशातून दुसऱ्या देशात जातानाचं तिकीट किंवा कसलं बुकिंगही हातात नाही, कोणीही ओळखीचं सोबत नाही, तरीही तेरा देश, तीन महिन्यात ती एकटी फिरुन आली..! तिथं जाऊन स्वत:च स्वत:चं भाड्याचं घर शोधलं, तिथं मिळणारे पदार्थ आणून स्वत: बनवून खाल्लं. (तिचा स्वयंपाक त्या अर्थानं तिथेही सुटला नाहीच) आधी गंमत वाटणारा हा तिचा प्रवास माझ्यासाठी पुढे पुढे भितीचं आणि काळजीचे कारण ठरु लागला. तिच्याशी बोलताना मी तिला ते दाखवत नव्हतो. पण मनात काळजी वाटत होती. या तीन महिन्यात तिला एकदा खूप एकटंही वाटलं. सगळं सोडून परत येते म्हणाली, पण पुन्हा जिद्दीने उभी राहीली. मराठी घरात, एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात जन्माला आलेल्या तिचं धाडस तिनं नंतर पुस्तक रुपानं समोर आणलं. तेव्हा सगळ्यांनी तिचं केवढं कौतूक केलं... तेव्हा मला झालेला आनंद या लेखातून नाही मांडता येणार... अशी ती धाडसी महिला... माझी पत्नी... जीवनसाथी... दीपा...!

नवरात्रीच्या निमित्तानं माझ्या आयुष्यावर प्रभाव असलेली, टाकलेली महिला या विषयावर लिहून देता का? असा मेसेज मला माझा मित्र मनोज गडनीस यांनी पाठवला. प्रभाव पाडणारी महिला आई, पत्नी, मैत्रीणी, बहिण, मुलगी कुणीही असू शकेल. अगदी मोकळेपणानं लिखाण करा, त्या महिलेच्या व्यक्तीमत्वाचे वैशिष्ट, तुम्हाला भावलेले गुण, एखाद्या विशिष्ठ प्रसंगाची आठवण अशा काही मुद्यांचा अंतर्भाव करता येईल असंही त्यानं कळवलं होतं. नवरसातील वीर रस ओतप्रोत असणारी दीपा... माझी प्रेरणा... माझ्या घरातच तर होती...! त्यामुळे मी मनोजला तात्काळ होकार कळवला. तिच्याबाबतीत घडलं ते असं –

माझी एकुलती एक मुलगी गार्गी. ती टोरोंटो मध्ये शिकते. तिच्या यॉर्क युनिर्व्हसिटीकडून तिची निवड ऑस्ट्रीयाच्या व्हिएन्ना युनिर्व्हसिटी येथे एक्सचेंज प्रोग्राम अंतर्गत झाली. ती पाच सहा महिने तिथं रहाणार होती. या काळात तिच्या मदतीसाठी म्हणून दीपा तिच्याकडे गेली. तीथं जातच आहोत तर ऑस्ट्रीया आणि आजूबाजूचे काही देश जमलं तर फिरुन पाहू असं तिनं ठरवलं होतं. जाताना अनेकांनी तिला प्रश्न विचारले होते, एकटी जाणार..?, एकटीनं जाणं सुरक्षीत आहे का?, तुला एकटीला

रहायला भीती नाही का वाटणार..?, जर तुझी ट्रेन, किंवा फ्लाईट चुकली तर..?, तू कुठे हरवलीस तर...? ती ज्यांना कोणाला जाण्याबद्दल सांगत होती, ते सगळे तिचं अशा अनेक प्रश्नांनी स्वागत करत होते..! (आपल्याकडे आजारी माणसाला भेटायला जाणारे नको नको ते आजार आठवून आठवून त्याचे कसे वाईट झाले, तुम्ही काळजी घ्या, हे सांगत असतात तसे) पण ही एकटी गेली.

तिथं गेल्यावर तिला कळालं की मुलीच्या हॉस्टेलमध्ये तुम्हाला जास्तीत जास्त तीन चार दिवस रहाता येईल... ही तर तीन महिन्यानंतरच्या परतीचं तिकीट घेऊन गेलेली. काय करावे प्रश्न होता. पण तिने तो सोडवला आणि केवळ माझ्यासाठीच नव्हे तर एकट्याने प्रवास करणाऱ्या सगळ्या मुलींसाठी ती प्रेरणा ठरली.

तिथं गेल्यावर तीनं ऑस्ट्रीया आणि आजूबाजूच्या देशांचा नकाशा पाहिला. जवळपास अनेक देश होते. काही ठिकाणी ट्रेनने, काही ठिकाणी बसने जाता येण्यासारखी स्थिती. तेव्हा तिनं ठरवलं की काही ठिकाणी आपण जाऊन तर पाहू... आणि सुरुवातीला काही जवळचे देश फिरायचं ठरवलं. जसं मी सुरुवातीला सांगितलं तसं, कोणतही बुकिंग नाही, कोणतही अॅडव्हान्स तिकीट काढलेलं नाही. बस आणि ट्रेनचे तिकीट काढायचं, एक बॅग सोबत घेतलेली. असे करुन तिने तब्बल १३ देश फिरुन काढले. अनेक अनुभव या काळात तिला आले.

अनेकदा तिला एकटं ही वाटलं. मला इथे सतत काळजी वाटायची. हीने फोटो काढायला म्हणून कोणाला फोन दिला आणि तो फोन घेऊनच पळून गेला तर...? या प्रश्नापासून अनेक प्रश्न सतत माझ्या डोक्यात फिरत असायचे. तीन महिने ती तिकडे विविध देश फिरत राहीली आणि मी प्रश्नांच्या मागे फिरत राहीलो. वाटत असलेली भीती तिला बोलूनही दाखवता यायची नाही. कारण तशीच भीती तिला वाटू लागली तर... असा प्रश्न आला मी आणि गार्गी तिला प्रोत्साहन द्यायचो...! एका अर्थानं आम्ही आम्हाला धीर द्यायचो..! ती तर मस्त फिरत होती... न घाबरता...!

या काळात आलेले अनुभवही जीव खालीवर करणारे होते. एकदा प्रवासात तिच्या मोबाईलची बॅटरी संपली. तीच्या परतीचं बसचं तिकीट, बसचा नंबर मोबाईलमध्ये. इमेलवर. काय करावं तिला सुचेना. ती एका कॉफी शॉपमध्ये गेली. दोघांची भाषा एकमेकांना कळेना. शेवटी तिला कळाले ही लिहा चार्जर हवायं... तिने दिलेला चार्जर हिच्या मोबाईलला लागेना. खाणाखुणा करुन तिने तिचा कॉम्प्युटर वापरता येईल का? असं विचारलं. त्या कॉफी शॉपमधल्या बाईला कदाचित हीची अडचण समजली असावी. तिनं तिला कॉम्प्युटर दिला. तिनं इमेल अॅक्सेस करुन तिकीटाचं प्रिंटआऊट काढलं. तिला धन्यवाद दिले. कॉफीशॉपच्या बाहेर आली, थोडे चालत पुढे गेली तर तिची बस तेथे आलेली... त्यावेळी तिच्या डोळ्यातले अश्रू मला तिनं न सांगताही दिसले होते..

चार दिवसासाठी तिने एक घर ऑनलाईन बुकींग करुन रेंटवर घेतलं. ऑनलाईन पैसे भरले. तेव्हा तिला एक मेल आला. त्यात एक अॅड्रेस दिला होता. तुम्ही या अॅड्रेसवर जा, तिथे अमुक मजल्यावर अमूक ठिकाणी एक रुम आहे. त्याला डिजीटल लॉक आहे. त्याचा हा पिनकोड, तो टाईप करा, दार उघडेल. आत आणखी एक दार आहे. त्याचा नंबर अमूक अमूक आहे. तो टाईप केला की एक बेडरुम, किचन तुमचे स्वागत करेल. पीनकोड आणि नंबर तुम्ही जेवढ्या दिवसाचे बुकींग केले आहे तेवढे दिवस असतील. त्यानंतर ते आपोआप चेंज होतील. तिनं मला हा सगळा किस्सा सांगितला. मी म्हणालो, कोणीतरी

फसवलेलं दिसतयं. असं कुठे असतं का..? पण जसं मेलमध्ये होतं अगदी तसचं घडलं. आतमध्ये फ्रीजमध्ये दूधाची बाटली, चहा, कॉफीचे सॅशे, काही ताजी फळ ठेवलेली होती. आपल्याकडे असं काही... असो....

पण हिंमतीनं आणि जिद्दीनं तीनं ते तीन महिने एकटीनं प्रवास करुन दाखवला. आल्यानंतर ती सगळे अनुभव सांगत होती. त्यातून तिनं काढलेले फोटो पहाताना याचं पुस्तक का करु नये असा प्रश्न मनात आला, आणि तिच्या अनुभवांचं, तिनं पाहिलेल्या युरोपचं अतीशय सुरेख असं पुस्तक निघालं. ''युरोप : इटस् जस्ट हॅपन'' हे पुस्तकाचं नाव. हे पुस्तक आता बुकगंगा, आणि ॲमेझॉनवरही उपलब्ध आहे. पुस्तक प्रकाशनाच्या वेळी लोकमतचे ऋषी दर्डा, दिग्दर्शक महेश मांजरेकर, ज्येष्ठ अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, अभिनेता मकरंद अनासपुरे अशा अनेकांची उपस्थिती होती. सगळ्यांनीच तिच्या या धाडसाचं कौतुक केलं. मी कुठंही एकटा जाऊ शकत नाही... मला सतत कोणाची तरी सोबत हवी असते... त्यामुळं माझ्यासाठी तर ती नक्कीच प्रेरणा आहे...! या पुस्तकात तिनं एका ठिकाणी लिहीलेलं मुद्दाम तुमच्यासाठी देतोय...

हंगेरी, बुडापेस्ट : मी माझ्यासाठी जगताना... (युरोप : इटस् जस्ट हॅपन पुस्तकातून अनुवादित)

''हंगेरी देशाची राजधानी बुडापेस्ट. बुडा आणि पेस्ट अशा दोन गावांपासून बनलेली राजधानी बुडापेस्ट. नैसर्गिक गरम पाण्याच्या वाहत्या झऱ्यामुळे असेल की काय; पण खूप उबदार आणि स्वागतासाठी उत्सुक असलेला हा देश वाटला मला... यंत्रांवर अवलंबून राहिल्याने काय काय सोसावं लागतं याचा धडा देणारा हा देश. आपण कसे कागद आणि पेन विरहित जगात चाललोय हे मी ऐकलं होतं पण तो अनुभव मला या देशाने दिला. हा देश आणि ही राजधानी मला आणखी एका कारणासाठी कायम लक्षात राहील. आज पर्यंत कधी नवऱ्यासाठी, कधी मुलीसाठी, कधी नातेवाईकांसाठी अशीच मी जगत आले. मात्र या देशात मी स्वत:साठी म्हणून खाण्याच्या वस्तू विकत घेतल्या, स्वत:साठी जेवण बनवलं, आणि मी एकटीने ते खाल्लं... खऱ्या अर्थानं स्वातंत्र्याचा मी घेतलेला हा वेगळा अनुभव होता...!''

(लेखक लोकमत मुंबई चे वरिष्ठ सहाय्यक संपादक व ज्येष्ठ पत्रकार आहेत)

ooo

**सांडून चार ओळी**
**मी रिक्त होत आहे..**
**दोन ओळीतल्या अंतरात**
**मी व्यक्त होत आहे..**

**तुटता तुटत नाही**
**नाजूक हे धागे**
**तोडता हा पाश**
**अजुनी सक्त होत आहे..**

**शब्द माझा तुझ्यापर्यंत**
**कधी पोचलाच नाही**
**थकून तो शब्द आता**
**जणू अव्यक्त होत आहे..**

**बांध फुटल्या आसवांची**
**गालावर ती रीघ**
**आसवे ती सुकून**
**मी मुक्त होत आहे..**

**विसरू म्हणतो सारे**
**मोहाचे हे बंध, पण**
**वाटेवर विरक्तीच्या**
**मी आसक्त होत आहे..**

**विवेक कडवे**

# बेभरवशाची रुग्णसेवा



– ॲड.समीर शिंदे

कोरोना काळात नाशिकमध्ये ऑपरेशन हॉस्पिटल अंतर्गत एक मोठे अंदोलन जितेंद्र भावे, रोहन देशपांडे व त्यांचे असंख्य सहकारी यांनी उभे केले. कोरोना काळातील हॉस्पिटलच्या लुटीचे धडधडीत पुरावे फेसबुक लाईव्ह करून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. हा एक प्रामाणिक व धाडसी प्रयत्न होता. वास्तविक जितेंद्र भावे आपचे व रोहन देशपांडे मनसेचे, परंतु पक्षीय राजकारण बाजूला ठेवून या दोघांनी जे जळजळीत सत्य लोकांसमोर मांडले ते फार भयानक होते. एव्हढे होऊनही अजूनही कुठल्याही हॉस्पिटल वर अथवा वैद्यकीय व्यक्तीवर कुठलीही कठोर कारवाई झाली नाही.

साधी गाडी दुरुस्तीला टाकायची तरी आपण चार गॅरेज बघतो, कुठला मेकॅनिक चांगला आहे, अनुभवी आहे वगैरे सगळे तपासून घेतो. मगच गाडी दुरुस्तीला टाकतो. त्यातही कुठले पार्टस टाकतो, बदलतो सर्व जातीने हजार राहून तपासतो. तरीही फसगत होतेच, ती टाळण्याचा प्रयत्न करतोच. वाशिंग मशीन, टीव्ही, एसी काहीही दुरुस्त करायचे तर किती काळजी घेतो, काम नीट झाले नाही तर वाद घालतो, बील चारवेळा तपासून बघतो, डिस्काउंट मागतो.

जिवंत माणसाला मात्र अत्यंत विश्वासाने डॉक्टरच्या किंवा हॉस्पिटलच्या ताब्यात देतो. तो सांगेल ते प्रमाण मानून, तो सांगेल ती औषधे आणतो. जे सांगेल ते करतो, जेव्हढे सांगेल तेव्हढी बिले भरतो, ऐपत नसेल तर अगदी घरदार विकतो पण हॉस्पिटलची बिले भरतो. आणि एव्हढे करून आपले आप्त दगावले तर आपल्याला हॉस्पिटलकडे दाद मागण्याचा देखील हक्क नाही ? ऑपेरेशन हॉस्पिटलमुळे या व्यवसायाची काळी बाजू उजेडात आली व काही बाबी प्रकर्षाने दखल घ्याव्या इतक्या गंभीर आहेत.

भारतातील आरोग्यसेवा रुग्णसेवा आता अतिशय बेभरवशाची झाली आहे. शस्त्रक्रियेसाठी (ऑपरेशनसाठी) रुग्णाला डॉक्टरच्या हवाली केले, तर रुग्ण सहीसलामत परत येईल याची आजकाल खात्री राहिली नाही. ऑपरेशन पूर्वीच सर्व पैसे जमा करून घेतले जातात. ऑपरेशन मध्ये काही बरे वाईट म्हणजे वाईट झाले तर त्याची जबाबदारी डॉक्टरवर आणि हॉस्पिटलवर राहणार नाही असा फॉर्म नातेवाईकांकडून भरून सही करून घेतला जातो. गरज नसतांना अनेक तपासण्या केल्या जातात. गरज नसतांना ऑपरेशनचा खेळ मांडला जातो. ऑपरेशनची गरज निश्चित केली जात नाही. ज्याची खरंच गरज आहे अशा ऑपरेशनपूर्व तपासण्या पूर्ण केल्या जात नाही. ऑपरेशन थिएटरची सफाई नीट नसते. तेथील मदतनीस म्हणजे काही वेळा अक्षरशः अशिक्षित कंपौंडर, वार्डबॉय, आया असतात. ऑपरेशनसाठी वापरलेली उपकरणे जंतूमुक्त नसतात. ऑपरेशन करणारा डॉक्टर अनेकदा शिकाऊ असतो. किंवा मुख्य भाग उरकून थोडा अनुभवी डॉक्टर निघुन जातो व बाकी काम शिकाऊ डॉक्टर्स, वार्ड बॉय, आया करतात. ऑपरेशन झाल्यानंतर योग्य माहिती रुग्णांच्या नातेवाईकांना दिली जात नाही. विशेषतः काही

चुकीचे झाले असल्यास माहिती दडवून ठेवली जाते. हॉस्पिटल मध्ये सेक्युरिटी व प्रशासनाच्या नावावर काही टगे याचसाठी नेमलेले असतात की रुग्णांच्या नातेवाईकांना दमदाटी करता येईल. प्रकरण फारच अंगावर आले तर रुग्णाला इतर हॉस्पिटल मध्ये हलवण्याची सक्ती केली जाते. चुकीच्या ट्रीटमेंट मुळे रुग्ण मरणपंथाला लागतो. पण त्याची जबाबदारी कुणीच घेत नाही. मरणपंथाला लागलेल्या रुग्णाला देखील सोडले जात नाही. नातेवाईक जर अडाणी असतील, गरीब असतील, एकटे असतील किंवा एकमेकांमध्ये भांडत असतील तर अशा रुग्णाचे अवयव देखील काढून घेतले जातात, त्याचा पत्तादेखील नातेवाईकांना लागत नाही. नातेवाइकांपैकीच एखादा दलाल असतो. कट प्रॅक्टिस तर या व्यवसायात सर्वमान्य आहे, इतका निर्लज्जपणा आहे. वाढीव व अवास्तव बिल तर सरसकट सर्वच हॉस्पिटलमध्ये दिले जाते. औषधे मागवतांना जास्तीची औषधे, इंजेकशन्स, ड्रिप्स, रक्त, मागवून ठेवले जाते, त्यातील निम्मेच रुग्णांसाठी वापरले जाते, निम्मे फार्मसीला परत जाते, त्याचेही पैसे हॉस्पिटलला मिळतात, रुग्णाला पत्ताच लागत नाही. मेलेला रुग्ण काय भांडायला येणार. कायद्याने रुग्णांना काहीच संरक्षण नाही. फसवले गेलेले नातेवाईक कुठेही दाद मागू शकत नाही. या हॉस्पिटलचे ऑडिट, चेकिंग करणारी, गैरप्रकार रोखणारी यंत्रणा अस्तित्वात नाही. इंडियन मेडिकल असोशिएशन काहीही करत नाही. सरकारची व शासनाची यंत्रणा काहीच कामाची नाही. कधीतरी मोठे प्रकरण झाले तर रुग्णालयाला भेट देणे, फोटो काढून घेणे व पेपरात, मीडिया मध्ये झळकणे इतकेच काय ते मंत्रांचे व अधिकाऱ्यांचे योगदान असते. पोलीस वैद्यकीय व्यवसायिकांविरुद्ध केलेल्या तक्रारींची दखल घेत नाही. ग्राहक आयोगाकडे केलेल्या तक्रारीची दखल घेतली जात नाही. मग सर्वसामान्य नागरिकांनी कुणाकडे जावे? या विषयाचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे.

ооо

*आपत्ती व्यवस्थापन व प्रगती*

आपत्ती व्यवस्थापन करणे प्रत्येक व्यक्तीला, कुटुंबाला, बिझनेसला, राज्याला, देशाला व सध्याच्या परिस्थितीत जगाला जरूरी असते. आपत्तीची चाहुल व काळाची पावले ओळखून आपल्याला अगोदरच तयारी करावी लागते. अगदी कोरोनासारख्या आपत्तीत देखिल रिस्क मॅनेजमेंट करता येते. अगदी संधी नाही मिळाली तरी क्षय टाळता येतो. प्रत्येकजण, प्रत्येक नाते, प्रत्येक बिझनेस, प्रत्येक अर्थव्यवस्था, प्रत्येक क्षणाला क्षय पावत असते (deteriorate किंवा depreciate) होत असते. त्यामुळे पर्याप्त प्रयत्न केले नाही तर आसपासच्या व अंतर्गत परिस्थितीनुसार व्यक्ती, कुटुंब, उद्योग, व्यवसाय, राज्य, देश, अर्थव्यवस्था संपते. व्यक्तीच नव्हे तर मोठीमोठी राज्ये, देशपण लयाला जातात. त्यामुळे सतत सतर्क राहणे, कार्यरत राहणे, क्षय टाळणे, अगदी छोटी का होईना, पण वृद्धी करणे, बदलत राहणे व आलेल्या प्रत्येक आव्हानाचे संधीत रूपांतर करणे हाच क्षय व कालंतराने विनाश टाळण्याचा व प्रगतीचा एकमेव मार्ग आहे. टर्नअराउंड मॅनेजमेंटमध्ये व मेंटरींग करतांना हाच सिद्धांत मी वापरतो. विचार साधा आहे, त्याची आखणी व अंमलबजावणी आव्हानात्मक आहे.

सकारात्मक रहा, सतर्क रहा, सुरक्षित रहा. शुभेच्छा.

- डॉ संदीप कडवे, पुणे, 4 मे 2021.

editor@panthastha.com | www.panthastha.com

# नो स्कुल नो फीस आंदोलन: विचार और सुझाव

कोरोना काल में स्कुल बंद रहे। अधिकांश स्कुलोंने फरवरी में ही अगले टर्म की फीस ले रखी थी। कुछ स्कुलोंने तो पुरे साल की फीस ले रखी है। अब पालक स्कूल्स फीस वापस मांगने जा रहे है तो फीस वापस नहीं कर रहें। स्कुल चल भी नहीं रहे और दूसरे टर्म की फीस मांगी जा रही है। अभिभावकोंकी पीड़ा समझते हुए , इस परिपेक्ष में कुछ मुद्दे है, जो सभींको ज्ञात होना जरुरी है।

१. स्कुल चलाना अभिभावकोंकी (पालकोंकी) जिम्मेदारी नहीं है। स्कुल का एक स्वतंत्र बिज़नेस मॉडल है, जिसके तहत स्कुल मालिक और प्रबंधन स्कुल चलाते है। स्कुल का फायदा उनका है, जमीन, बिल्डिंग, उपकरण, सब उनका है, इसमें विद्यार्थियोंकी या पालकोंकी कोई आर्थिक भागीदारी नहीं है। स्कुल चलाने से हुए फायदे में ना विद्यार्थियोंको ना पालकोंको कोई लाभ होता है। तो अगर कोरोना स्थिति में स्कुल बंद है और तथाकथित रूप से अगर किसी स्कुल को आर्थिक हानि होती है तो उसका उत्तरदायित्व पालकोंका नहीं है। पालकोंपर यह आर्थिक क्षतिपूर्ति करनेका दबाव ना बनाया जाये।

२. कोरोना काल में स्कुल अभिभावकोंने या विद्यार्थियोंने बंद नहीं करवाई है। स्कुल को अगर आर्थिक मदत चाहिए तो स्कुल जिनके आदेश से बंद करवाई है, क्षतिपूर्ति उनसे मांगी जाएं।

३. पालक और विद्यार्थी फीस देती है और स्कुल में शिक्षक उन्हें पढ़ाते है। इतना सरल व्यवहार है। अगर नहीं पढ़ाते है तो फीस लागु नहीं है। जो सेवा दी नहीं उस सेवा का मूल्य चुकानेका कोई प्रश्न ही नहीं उठता। अगर कोई स्कुल ऐसे फीस की मांग करता है, भले ही एक रूपया भी मांग रहा हो, यह अनीतिकारक और दुर्भाग्यपूर्ण है।

४. स्कुल ऑनलाइन पढ़ाने की जिद ना करें। ऑनलाइन पढ़ाने के लिए और कई विकल्प मौजूद है। उसके लिए स्कुल के पढ़ने की आवश्यकता नहीं है। और ये विकल्प जैसे अनएकेडमी, यू ट्यूब के कई चॅनेल्स, अधिकांश ऑनलाइन पोर्टल्स, ज्यादातर फ्री में पढ़ाते है और अधिक अच्छे तरीकेसे पढ़ाते है। स्कुलोंके अधिकतर शिक्षक ऑनलाइन पढ़ाने में सक्षम नहीं है, ना ही उनके पास ऐसे संसाधन है, ना ही उनको वो अनुभव है, ना ही उनके पास वैसा मटेरियल है। ऑनलाइन पढ़ाना एक संपूर्ण अलग तरीका है और स्कुल या स्कूलोंमें पढ़ाने वाले शिक्षिक ऑनलाइन पढ़ाने के लिए सक्षम नहीं है। यही सत्य है और इसमें किसीका अनादर करनेका हेतु नहीं है।

५. अगर कोई पालक अनिश्चितता, कोरोना के कारण स्वयं और अपने जीव की रक्षा हेतु या फिर एक्ट ऑफ़ गॉड के कारन स्थिति से सामना करने से असक्षम होने के कारण, या फिर ऐसे शिक्षा प्रणाली जो की उनपे थोपी जा रही है और जिससे पाल्य का शारीरिक या मानसिक या अन्य उत्पीड़न या नुकसान हो सकता है इस कारण, अपने पाल्य को स्कुल नहीं भेजना चाहता है या फिर ऑनलाइन क्लासेज को अटेंड नहीं कराना चाहता है, तो यह उसका अधिकार है। कोई स्कुल प्रबंधन (मैनेजमेंट), शिक्षिक, सरकार न ही पाल्य

को, न ही पालक  के लिए बाध्य कर सकती है। अगर कोई ऐसा प्रयास करता है तो यह प्राकृतिक न्याय के विरुद्ध है और पाल्य और पालक दोनोके मौलिक अधिकारोंका हनन है।

६. कोरोना के असाधारण स्तिथी के लिए  पाल्य और पालक कारण नहीं है, न ही ऐसी स्थितिके लिए  स्कुलोंके प्रति उनका कोई उत्तरदायित्व बनता है।  अगर कोई स्वयं प्रेरणा तथा सामाजिक उत्तरदाईत्व के भाव से किसी शिक्षक या स्कुल की मदद  करना चाहे तो यह उनका वैयक्तिक निर्णय होगा, स्कुल या शिक्षिकोंका अधिकार नहीं।  इस वैयक्तिक निर्णय का उदाहरण देके या उसका आधार बनाके बाकि सभी पालकोंसे या पाल्योंसे आधिकारिक तरीकेसे किसीफी फीस की मांग नहीं की जा सकती है।

७. क्यों की पालक और पाल्य स्वयं ही इस  स्थिती के कारण पीड़ित है, कोई स्कुल प्रबंधन न तो उनसे फीस के मांग कर सकती है न ही उनपे कोई दंडात्मक कारवाई कर सकती है। जिनके  आदेश के कारण यह स्थिति उत्पन्न हुई है, वह प्रशासन और सरकार, ऐसे कोई दंडात्मक कारवाई का विरोध करें तथा ऐसे कारवाई करनेवालों शिक्षा संस्थानोपर तुरंत दंडात्मक कारवाई करें। तथा ऐसे कारवाई से जिन पाल्योपर अथवा पालकोंपर स्कुलोंने कारवाई की है और जिसके कारण पाल्योंका अथवा पालकोंका नुकसान हुआ है, उनको स्कुलोंने नुकसान भरपाई देनी चाहिये।

८. पूरी शिक्षा प्रणाली के पुनर्रचना या पुनर्गठन का समय आ चूका है।  इसके लिए एक स्वतंत्र सुझावपत्र दिया , उसपे चर्चा होनी चाहिये। प्रशासन और सरकार ये उत्तरदायित्व है।  हो सकता है, इससे वर्त्तमान में जिस प्रकार स्कुलोंका सञ्चालन हो रहा है उसमे असाधारण बदलाव हो और कई स्कुल बंद हो। अगर यह बदलाव विद्यार्थियोंके और अभिवावकोंके हित में है तो बिना संकोच ऐसे सुधारोंको तत्काल प्रभाव से लागू कर देना चाहिए।  एक ही बार सभी विद्यार्थियोंका आधार जैसा केवल शिक्षा के लिए रजिस्ट्रेशन हो और यह रजिस्ट्रेशन नंबर पुरे जीवन में लागु हो।  कोई स्कुल छोड़ना चाहे, बदलना चाहे, सभी समय एकही यूनिक एजुकेशन रजिस्ट्रेशन नंबर (ERN) का वापर करके उस विद्यार्थी के सभी रिकॉर्ड, मूल्याँकन, सर्टिफिकेट्स एकही नंबर पर ऑनलाइन प्राप्त होने चाहिए। इसे ERN Portability भी कह सकते है।

९. ऐसे किसीभी पुनर्रचना या पुनर्गठन के चार उद्देश्य होने चाहिए

अ. शिक्षा पर होनेवाला व्यय (आर्थिक व्यय, समय का व्यय, सामाजिक सुविधाओंका व्यय, मूल्योंका व्यय ) कमसे कम हो।  अंततः आर्थिक रूप से शिक्षा सभी के लिए आर्थिक रूप से पूर्णतया मुफ्त हो।

ब. समय के अनुसार अध्ययन का स्तर बढ़ाये और उसमे टेक्नोलॉजी की सहायता ली जाए। इससे कही भी कोई भी अध्ययन करने में सक्षम हो। ग्रामीण शिक्षा प्रणाली का एवं समाज जे सभी स्तरों पर लाभ हो इस बात का विशेष ध्यान रखना चाहिये।

क. विषयोंका चयन और कितने समय में क्या सीखना है, कैसा सीखना है यह विकल्प विद्यार्थियोंके पास होना चाहिए। बीचमे पढ़ाई छोड़ने का फिरसे पढ़ाई शुरू करनेका अधिकार विद्यार्थियोंके पास होना चाहिए।  बीचमे अगर कोई विद्यार्थी प्रशिक्षण पाना चाहता है, या फिर प्रत्यक्ष रूप से कार्यानुभव पाना चाहता है तो यह उसके लिए संभव होना चाहिए।

ड. शिक्षा पाने से विद्यार्थियोंके तथा शिक्षकोंके अंततः समाज और राष्ट्र के हर नागरिक के जीवनस्तर में वृद्धि होनी चाहिए। केवल डिग्री पाना शिक्षा का उद्देश्य नहीं होना चाहिए। मूल्यवर्धित शिक्षाप्रणालिका निर्माण करना चाहिए।

OOO

# विश्व पांथस्थ प्रवासाच्या टिप्स - राजस्थान



राजस्थान एक छान पर्यटन राज्य आहे. मोठे राज्य आहे. वाळवंट आहे, पर्वतराजी आहे, जंगल आहे, मोठे तलाव आहेत, राजवाडे आहेत. स्वतः गाडी चालवत जाणार असाल तर ठिक ठिकाणी थांबून आपल्या सोयीनुसार प्रवास करता येतो. रस्ते चांगले आहेत.

**चित्तोडगढ:** हा किल्ला बघण्यासारखा आहे. संपूर्ण किल्ला १३ किलोमीटरचा परिसर गाडीतून बघता येतो. फार थोडे चालावे लागते. गाईड २००-४०० रुपये घेतो. राणी पद्मिनीच्या पूर्वीही हा किल्ला प्रसिद्ध होताच. किल्ल्यावरून शहराचे छान दर्शन होते.

**अजमेर:**चितोडगड पासून साधारण १९६ किमी अंतरावर आहे. रस्ता चांगला आहे. अजमेर ला एक मोठा तलाव आहे, खूप बघण्यासारखा आहे. बाकी रस्त्यावरची ट्रॅफिक इतकी आहे कि १-२ किमी जाण्यासाठी ३०-४० मिनटं सहज लागतात. पण शहराच्या बाहेर पडल्यावर छान वाटते. शहराच्या बाहेर पडल्यावर पुष्कर कडे जातांना टेकडीवर महाराणा प्रताप यांचा पुतळा व बगीचा आहे. संध्याकाळी गेलात तर लेसर शो बघण्यास मिळतो. टेकडीवरून अजमेर शहर खूप सुंदर दिसते.

**पुष्करराज:**अजमेरपासून केवळ १८ किमी अंतरावर पुष्कर सरोवर आहे. जगदपिता ब्रह्मामुळे प्रसिद्ध आहे. येथे सरोवरात स्नान करून जलपूजा करतात. पुजारी सांगतांना ११ रुपयाची पूजा थाळी घ्या असा प्रेमळ सल्ला देतात व पूजेला बसल्यानंतर वेगवेगळ्या म्हणजे अन्नदान, ब्राह्मणभोजच्या नावाखाली (इतर तीर्थक्षेत्री पुजारी करतात) तशी भावनिक दबाव टाकून दक्षिण वसुली करतात, त्यापासून सावध राहावे पण जलपूजन जरूर करावे. स्थानिक प्रशासनाने सरोवर परिसर छान स्वच्छ ठेवला आहे. ५२ घाट आहेत. आत वेशीतून आत शिरल्याबरोबर मोटारसायकल वरून हॉटेलसाठी दलाल आपला पाठलाग करतात. राहण्याची सोय (अगदी ५०० रुपयापासून रुम मिळते) स्वस्तात व छान होते. संपूर्ण शाकाहारी भोजनच मिळते. इस्राएल, तिबेट, इटालियन वगैरे पदार्थ मिळतात. रस्त्यावर खूप परदेशी पर्यटक दिसतात व ते इथे कित्येक आठवडे मुक्काम करतात. छोट्या छोट्या गल्ल्या व हॉटेल्स आहेत. गुलकंद रबडी जरूर टेस्ट करा. सगळीकडे गायी दिसतात. गाडी एका ठिकाणी पार्क करून पायी फिरावे लागते. सुंदर व शांत आहे. आवर्जून जावे व मुक्काम करावा असे ठिकाण आहे. पाचवे धाम गणले जाते. शांत व प्रसन्न वाटते. अजमेर व पुष्करच्या संस्कृतीत कमालीचा फरक आहे. अश्विन महिन्यात मोठा मेळा असतो, खूप गर्दी असते.

**नाथद्वारा:**श्रीनाथजी मंदिर इथेच आहे. पुष्कर-अजमेरपासून उदयपूरला जातांना उदयपुरपूर्वी १-१/२ तासाच्या अंतरावर रस्त्यावरच नाथद्वारा आहे. आत शिरतांना मोठी कमान दिसते. गाडी मंदिरापासून १-२ किमी दूर पार्क करावी लागते. राहण्याची सोय भरपूर आहे. दर्शनासाठी खूप गर्दी असते मोठी रांग असते. अर्थात १०० रुपये दलालाला व २०० रुपये प्रति व्यक्ती तखझ तिकीट काढले कि थोडे लवकर दर्शन होते.

**उदयपूर:**अतिशय चिंचोळ्या गल्ल्यांचे शहर आहे. ज्या रस्त्याने एक गाडी महामुश्किलीने जाईल तेथे दोन्ही बाजूने गाड्या कशी जातात प्रश्नच आहे. हॉटेलचे दर सीझनप्रमाणे बदलतात व सिझनला लूट करतात. अनेक तलाव आहेत, त्या बाजूला अनेक हॉटेल्स आहेत. लेक साईड हॉटेल अशी जाहिरात करतात, जिथे गाडी देखील नेऊ शकत नाही. छोट्या रूम्स, अगदी खिडकी नसलेल्याही आहेत. तेव्हा सावध. सिटी पॅलेस राजवाडा बघण्यासारखा आहे, पण गर्दी असेल तर मात्र संपूर्ण गोंधळ असतो. ही येथील राजाची खाजगी प्रॉपर्टी आहे. तिकीट महाग आहे. बऱ्याच जणांची निराशा होते. पैसे कमावणे हाच उद्देश ठेऊन इथे व्यापार होतो. इतर तलाव छान आहेत. शहर अतिशय चिंचोळ्या गल्ल्यांमुळे (कु)प्रसिद्ध आहे.

**जयसमंद:** उदयपूर पासून ५५ किमी अंतरावर एक फार सुंदर तलाव आहे. जैसमंद. येथे तलावाच्या आत आलिशान हॉटेल आहे. रेंट ९,००० रुपये एका रात्रीचे. तलाव परिसर खूप सुंदर आहे. जयसमंद गावात एकमेव ३ हॉटेल आहे. रूम ठीक आहे. जेवण्याची व्यवस्था ढाब्यावर होऊ शकते.

येथून पुढे बांसवाडा जवळ माही डॅम नावाचा मोठा डॅम आहे. तसेच अभयारण्य आहे. ठिकठिकाणी छोटे छोटे तलाव पाहण्यास मिळतात. राजस्थान म्हणजे वाळवंट ही चुकीची प्रतिमा आपल्या डोळ्यासमोर असते, त्यामुळे असा हिरवागार, जंगलांनी, अरवली पर्वत रांगांनी व तलावांना नटलेला परिसर खूपच छान वाटतो.

# इनक्युबेट पार्टनर्स म्हणजे बिझनेसचे डॉक्टर आहेत.

नवा उदयोग व्यवसाय जन्माला घालण्यासाठी नवउद्योजकांना मार्गदर्शन करणे, जन्माला आलेला उद्योग व्यवसाय आपल्या पायावर उभा राहील यासाठी मदत करणे, पायावर उभा राहिलेला उद्योग व्यवसाय समर्थ कसा होईल, आजारी पडलेला उद्योग व्यवसाय बरा कसा होईल व सुदृढ बिझनेस निरंतर कसा वाढेल, यासाठी "उद्योग व्यवसायाचे डॉक्टर" असा इनक्युबेट पार्टनर्सचा व्यवसाय आहे. स्टार्ट अप आंत्रपुनर, इन्व्हेस्टर, नवजात वा पिढीजात उद्योजक, विविध क्षेत्रातील आजारी वा सुदृढ बिझनेस, अगदी पेशंट तपासणारे मेडिकल डॉक्टर यांना देखील मेंटरींग ची गरज असते. माणसाला जशी निरोगी राहण्यासाठी चांगल्या फॅमिली डॉक्टर ची गरज असते, तशी उद्योग व्यवसायाला एका चांगल्या मार्गदर्शकाची, गुरुची गरज असते. माणसाला जशी रक्ताची गरज असते तशी उद्योग व्यवसायाला पैश्याची गरज असते, माणसाला जशी डोळ्याची व बुद्धीची गरज असते, तशी उद्योग व्यवसायाला व्हिजन स्ट्रॅटेजी ची गरज असते, माणसाचे जसे विविध अवयव असतात, त्याचप्रमाणे उद्योग व्यवसाय करण्यासाठी देखील विविध सहकाऱ्यांची, तंत्रज्ञानाची, यंत्रणेची व विभागांची गरज शरीरातील पेंशीप्रमाणे सतर्क राहून सतत कार्य करत असेल तर निरोगी माणसाप्रमाणे उद्योग व्यवसाय देखील निरोगी राहू शकतो. उद्योग व्यवसाय का करावा, तर सृजनासाठी, निर्मितीचा व सेवेचा आनंद मिळवण्यासाठी. किती दिवस दुसऱ्याची चाकरी करणार? तुमचे स्वप्न कधी साकार करणार? पण बिझनेस चालू करतांना व चालवतांना काळजीपुर्वक व जाणकारांच्या मार्गदर्शनाखाली चालवला तर यशस्वी होण्याची शक्यता वाढते. हेच मार्गदर्शन आम्ही करतो. उद्योग व्यवसायाच्या कुठल्याही टप्प्यावर जर तुम्हाला निष्णात मार्गदर्शकाची अर्थात बिझनेस डॉक्टरांची गरज लागली, तर निःसंकोच संपर्क करा.

माफक फीस.

mentor@in3bet.com www.in3bet.com WA# +91 9860678844

**सक्रिय राहा, समर्थ व्हा, धनवंत, कीर्तिवंत व्हा ! निरोगी मानसिक, शारीरिक, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक आरोग्यासाठी सर्वांना शुभेच्छा !**

in3bet
Incubate Partners

Innovate
Incibate
Invest
Build
Expand
Tranform